महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक :- १४४२(२)(२)/२०२३/तेवीस दिनांक : - १६ जुलै, २०२४

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

विषय :- महाराष्ट्र अराजपत्रित, गट- ब सेवा मुख्य परीक्षा – २०२३ (जाहिरात क्रमांक ०७०/२०२३). राज्य कर निरीक्षक संवर्गाचा सुधारित निकाल क्र.३ व सहायक कक्ष अधिकारी या संवर्गाची सुधारित तात्पुरती निवड यादी क्र. ३ प्रसिद्ध करणेबाबत तसेच संमती विकल्प मागविणेबाबत.

उपरोक्त विषयांकित परीक्षेसंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र.५६९/२०२४ प्रकरणी दिलेल्या दिनांक १८ जून, २०२४ रोजीच्या निर्देशानुसार तीन संवर्गाची शिफारस यादी / तात्पुरती निवड यादी मधील उमेदवारांसाठी संमती विकल्प (Consent Submission) मागविण्याची प्रक्रीया राबविण्यात आली होती.

२. संमती विकल्पाआधारे राज्य कर निरीक्षक संवर्गाचा सुधारित निकाल क्र. ३ व सहायक कक्ष अधिकारी संवर्गाची सुधारित तात्पुरती निवड यादी क्र. ३ सोबत जाहीर करण्यात येत आहे.

३. तथापि उपरोक्त निकालामध्ये काही उमेदवारांची एकापेक्षा जास्त संवर्गासाठी निवड होत असल्याचे निदर्शनास येत आहे. यास्तव अशा उमेदवारांकडून ते कोणत्या संवर्गाकरिता प्रथम पसंती देत आहेत. याबाबत त्यांचे पुन्हा संमती विकल्प (Consent Submission) पुन्हा मागविण्यात येत आहेत. या अनुषंगाने त्यांच्या प्रोफाइलमध्ये संमती विकल्प उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यानुसार उमेदवाराचा विचार फक्त संमती विकल्प दिलेल्या संवर्गासाठी करण्यात येईल. त्यासाठी उमेदवारास 'स्विकारले''(Accepted)' हा पर्याय निवडावा लागेल. उर्वरित संवर्गासाठी उमेदवारास 'Give up 1' हा पर्याय निवडावा लागेल. ज्या संवर्गासाठी 'Give up 1' पर्याय निवडला आहे, त्या संवर्गाकरिता त्यांच्या उमेदवारीचा विचार न करता इतर उमेदवारांचा गुणवत्तेवर विचार करण्यात येईल.

४. प्रस्तुत परीक्षेसाठी संमतीविकल्प (Consent Submission) सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Consent Submission' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक १६ जुलै, २०२४ रोजी १९.०० वाजेपासून दिनांक २३ जुलै, २०२४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

५. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या आदेशानुसार संमती विकल्प मागविण्यात येत असल्याने सदर संमती विकल्प ऑनलाईन पध्दतीने आयोगास सादर करणे अनिवार्य आहे.

६. आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या उपरोक्त कालावधीत विहीत ऑनलाईन पध्दतीने संमतीविकल्प सादर न केल्यास संबंधित उमेदवाराचा अंतिम निवडीकरिता विचार करण्यात येणार नाही.

७. संमती विकल्प (Consent Submission) सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

उपसचिव(परीक्षोत्तर)(अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण :नवी मुंबई